CON 120

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ९ जुलै २०२३

[**वेळ :** सकाळी १०-३० ते दुपारी १-१५]

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण — १००)**

---

**सूचना.**— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

**गुण**

प्रश्न क्र. १. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :— १०

साखरेत सर्वांत अधिक कॅलरीज असतात, म्हणून बिनसाखरेचा चहा सुरू केला. पहिल्या दिवशी विशेष फरकही वाटला नाही. घरात साखरबंदी जाहीर केली. कुटुंबाला सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची सक्त ताकीद दिली. "मुलांसाठी म्हणून काय थोडं गोडाधोडाचं करायचं ते कर," एवढी सवलत ठेवली. पहिल्या दिवशीच मला फरक जाणवायला लागला. भात अजिबात वर्ज्य करणे अवघड होते, म्हणून फक्त पहिला भात आणि ताकभात ठेवून मधला भात वर्ज्य केला नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार किती पोकळ होता, याचा अनुभव ती खाल्ल्यावर आला आणि नेहमीच्या भाजीत 'ही' निराळे काय करते याचा अजूनही अंदाज आला नाही.

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्याहून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती, परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्याची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्याने तर माझ्या 'डाएट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ तयार केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार' च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्त्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते- म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती'त ला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) पंतांना खाल्लेले गोड का लागत नव्हते ?

(ब) पंतांच्या साखरबंदीचे तुमच्या भाषेत वर्णन करा.

(क) नाडगौडाला वाईट वाटू नये म्हणून पंतांनी काय केले ?

(ड) पंतांच्या कचेरीपर्यंत कोणती बातमी गेली ?

(इ) नाडगौडाने स्पेशल भज्यांची ऑर्डर का दिली ?

[ उलटून पहा

गुण

प्रश्न क्र. २. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा :— २०

(अ) आचार्य बाबा बर्वेची स्वभाव वैशिष्ट्ये ही ' उपास ' या पाठाच्या आधारे लिहा.

(ब) कोणतेही काम कमी दर्जाचे न मानता ते करायची सवय ठेवली तर मोठी कामे करताना अडचणी येत नाहीत हे ' मोठे होत असलेल्या मुलांनो ' या स्थूलवाचनाच्या आधारे लिहा.

(क) ' दुःख पेलावे आणि पुन्हा जगावे ' या ओळींतून कवी नारायण सुर्वे यांना काय सांगायचे आहे ते स्पष्ट करा.

(ड) तपोवनातील स्त्रिया व मुलींना अब्दुल देवदूतासारखा का वाटे हे विधान तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

(इ) पावडेकाकांनी सुमितवर राग व्यक्त केला ते ' फूटप्रिन्टस ' या पाठाच्या आधारे लिहा.

(फ) लेखक डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी त्यांच्या आईचे केलेले वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

प्रश्न क्र. ३. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दहा** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :— १०

(१) कोणाच्या अधःपाताने लोक समाधानी होतात ?

(२) सुनिताबाईंनी शालीबद्दल विचारताच लेखकाने लगेच हो का म्हटले ?

(३) कोणाच्या विचाराने पंतांची झोप उडाली ?

(४) कोणाच्या डोळ्यांतला क्रोध अब्दुलच्या परिचयाचा होता ?

(५) किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा कोणी वळवला ?

(६) लेखक रघुनाथ माशेलकर यांच्या बाबतीत त्यांचे सर्वस्व कोण होती ?

(७) कवयित्री इंदिरा संत यांच्याकडे कोणते सामर्थ्य नाही ?

(८) सुश्रुतची आजी त्याला कोणत्या गोष्टी सांगायची ?

(९) वाघीण कोठे लपली असावी असे लेखकाला वाटले ?

(१०) झाडाच्या जीवनाचे एक संथ गाणे कोठे दडले आहे ?

(११) लेखक चंदू बोर्डे यांचे वडील कुठल्या खात्यामध्ये नोकरी करत होते ?

(१२) निरंजनला कशाचा राग येई ?

(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा (कोणतेही **दोन**) :— ५

(१) जळ वरिवरी क्षाळी मळ। योगिया सबाह्य करी निर्मळ।
उदक सुखी करी एक वेळ। योगी सर्वकाळ सुखदाता।

(२) हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होवून सहाय्यास धावून आले.

(३) तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी.
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी.

प्रश्न क्र. ४. खालीलपैकी कोणत्याही **दहा** रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :— १०

(अ) या शाली घेऊन मी आता .................... बनू लागलो आहे.

(ब) रात्रंदिवस ते .................... माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते.

(क) मौन ही एक .................... आहे.

(ड) झोतभट्टीत शेकावे .................... तसे आयुष्य छान शेकले.

(इ) .................... सेतूबंधन केलं; पण त्यासाठी अनेकांचा हातभार लागला.

(फ) पुन्हा निळा तुकडा चमकला आणि काही क्षणातच त्या निळ्या तुकड्यावर पावडेकाकांची .................... उमटली.

(ग) माझ्याप्रमाणे शाळेचीही परिस्थिती .................... होती.

(ह) आपण सगळ्यांनी .................... मदत केली पाहिजे.

(य) .................... किती हा लहान.

(र) जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । .................... जेवीं पिलियांसी ।

(ल) .................... भोवती जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

प्रश्न क्र. ५. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :— १०

(१) सफल होणे (२) आनंद गगनात मावणे

(३) हकालपट्टी होणे (४) रात्रीचा दिवस करणे

(५) सोंग काढणे (६) भांबावून जाणे.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे अर्थ लिहा :— ५

(१) झाड (२) नदी

(३) गौरव (४) घर

(५) डोळा (६) आकाश.

प्रश्न क्र. ६. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा :— ५

(१) मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध .................... झालो.

(२) मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर .................... मात्र अजिबात विश्वास नव्हता.

(३) बांगड्या भरल्यानंतरचा त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद .................... लाखमोलाचा वाटे.

(४) .................... आज उठायला उशीरच झाला होता.

(५) हल्ली मी वजन आणि .................... या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे.

(६) कॅक्टस हे .................... खंडातले झाड आहे.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा :— ५

(१) शालीची शोभा आणि ऊब व पोटाची <u>आग</u> आणि अन्नाची उब.

(२) पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा <u>प्रसंग</u> आला.

(३) सग्वारो कॅक्टस हा कॅक्टसचा <u>राजा</u>.

(४) अब्दुलच्या हातातला <u>घास</u> हातातच राहिला.

(५) अभिषेकनं <u>दार</u> उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या.

(६) जगण्याचे <u>भान</u> दिले.

[ उलटून पहा

गुण

(क) खालीलपैकी कोणत्याही **पाच** नामांची वचने बदला :— ५

(१) वाघीण (२) पुस्तक
(३) चिमणी (४) मैत्रीण
(५) घड्याळ (६) खेळणी.

(ड) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांपासून नामे बनवा :— ५

(१) चतूर (२) शिक्षण
(३) संस्कृती (४) शूर
(५) उद्योग (६) प्रथम.

(इ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांच्या संधी सोडवा :— ५

(१) वनिताश्रम (२) अरुणाचल
(३) स्थित्यंतर (४) मुख्यालय
(५) सदाचार (६) गिरीश.

(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही **पाच** वाक्ये पुन्हा लिहा :— ५

(१) आई हिच प्रत्येक मूलाची पहिली शिक्षक असते.
(वाक्य शुद्ध करून लिहा)

(२) त्यांची माझ्यावर फार मोठी <u>कृपा</u> आहे.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखून लिहा)

(३) तुला लाडू आवडतो का?
(वाक्याचा प्रकार ओळखा)

(४) यावर तो शालीन कवी मनापासून हसला.
(कर्त्याचे लिंग बदल करा)

(५) सुमीत <u>भरभरून</u> बोलत होता.
(अधोरेखित शब्दाचा अव्यय ओळखा)

(६) साऱ्यांचे डोळे पाणावले.
(काळ ओळखा)

---

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ९ जुलै २०२३

[**वेळ :** दुपारी २-१५ ते सायंकाळी ४-४५]

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना.**— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

गुण

प्रश्न क्र. १. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा :— २०

(अ) स्त्रीभ्रूण हत्या एक अपराध

(ब) समाज घडविण्यात युवकांची जबाबदारी.

प्रश्न क्र. २. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :— २०

(अ) 'ऑनलाईन शिक्षण शाप की वरदान' याविषयी चर्चा करा.

(ब) मराठी भाषा अनिवार्य करणे गरजेचे आहे का? याविषयी चर्चा करा.

प्रश्न क्र. ३. खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— ३०

(अ) संचालक, सांस्कृतिक विभाग, यांच्यातर्फे कलाकारांना सन्मानाची योजना लागू केली आहे, त्यावर टिप्पणी व ज्ञापन तयार करा.

(ब) कापूस निर्यातीवरील बंदी उठविणेबाबत, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील संबंधित अधिकाऱ्यास विनंतीपत्र लिहा.

(क) तुमच्या भागातील रस्त्यांवर पडलेले खड्डे पावसाळ्यापूर्वी दुरूस्त करून घेण्यासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांना विनंतीपत्र लिहा.

प्रश्न क्र. ४. खालीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्द प्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या :— ५

(अ) Athlete (ब) Bench

(क) Charity (ड) Destruction

(इ) Efficiency (फ) Genetic.

प्रश्न क्र. ५. खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :— १०

(अ) Do an exercise otherwise you will not be healthy.

(ब) We learn from experience that men never learn anything from experience.

(क) In the first place, we must be careful about what we eat and drink.

(ड) You leave behind memories to cherish and values to guide.

(इ) This book is for students whose native language is not Marathi.

(फ) Steel production will increase 2% this month from last month.

[उलटून पहा

गुण

प्रश्न क्र. ६. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :— १५

The Kaurawas and Pandawas were learning archery from Guru Dronacharya. The fame of Dronacharya's teaching spread everywhere. Having heard of his fame once a Bhil-youth, Eklavya by name, approached him to learn the art of the archery. But Dronacharya was the preceptor of the princes. Well, how can he impart his art to a Bhil-youth! He flately refused. Poor Eklavya immediately returned with a dejected heart. But he did lose courage. He went to the forest and made an earthen statue of Guru Dronacharya. He began to practise the art of archery in front of the statue with full devotion.

---